# प्रकरण -1

श्रीमती म. तु. अगरवाल महापालिका सर्वसाधारण रुग्णालय,
डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, मुलुंड (प) मुंबई – **400 080**
दुरध्वनी क्रमांक – **25640767**
डॉ. उषा अरुण म्होप्रेकर – प्रमुख वैद्यकिय अधिकारी (प्रभारी)

## इतिहास

म. तु. अगरवाल, महापालिका सर्वसाधारण रुग्णालय मुलुंड (प) येथे 2 ऑक्टोबर 1958 रोजी सुरू झाले. मुंबईतील दानशूर अगरवाल कुटुंबाकडून मोकळा भूखंड रुग्णालयासाठी देण्यात आल्यामुळे, रुग्णालयाचे नाव श्रीमती म. तु. अगरवाल रुग्णालय असे ठेवण्यात आले. सुरुवातीला रुग्णालयाची इमारत तळमजला व त्यावर एक मजला यांच्यासाठी बांधण्यात आली ज्यात पुरुष व महिला यांच्यासाठी प्रत्येक 25 खाटांचे दोन विभाग होते. एक शस्त्रक्रियागृह होते जेथे वैद्यकीय अधिकारी किरकोळ शस्त्रक्रिया करीत असत.

रुग्णालयातील वेगवेगळ्या सेवांचा लाभ घेण्याची जनतेची वाढती गरज लक्षात घेऊन, रुग्णालय चालू झाल्यापासून दोन ते तीन महिन्यांच्या आतच बाह्यरुग्ण विभाग चालू करण्यात आला.

सन 1964 मध्ये क्ष किरण विभाग रुग्णालयाला जोडण्यात आला आणि अंशकालिन रेडिओलॉजस्ट व मानद रेडिओलॉजिस्ट यांच्या सेवा अनुक्रमे 1966 व 1971 साली उपलब्ध करण्यात आल्या. सध्या सर्व आवश्यक मशीनसह सुसज्ज क्ष किरण विभाग असून क्ष किरण व इतर वेगवेगळ्या चाचण्या केल्या जातात.

सप्टेंबर 1965 मध्ये, अंशकालिन दंत चिकित्सकाच्या सहाय्याने दंतचिकित्सा विभागाची भर घालण्यात आली.

पुर्व उपनगरातील मुलुंड, भांडूप इ. ठिकाणी विखुरलेल्या सर्वसामान्य जनतेची गरज लक्षात घेता सुरुवातीला असलेल्या खाटांची संख्या वाढवून जास्त आंतररुग्ण समाविष्ट करुन घेण्याची गरज निर्माण झाली होती. त्यानुसार वेगवेगळ्या विशेष शाखांमध्ये, खाटांच्या संख्येनुसार मानद कर्मचा-यांच्या नियुक्त्या करण्याची ही गरज निर्माण झाली होती. त्यामुळे मानद सहाय्यक स्त्री रोग तज्ञ व सहाय्यक फिजिशियन हे पद 1966 मध्ये तर मानद सहाय्यक फिजिशियन हे पद 1968 मध्ये निर्माण करण्यात आले.

अपंग, अवलंबित व जखमी रुग्णांसाठी आधिवयवसायोपचार व भौतिकोपचार हा विभाग 1969 मध्ये चालू करण्यात आला. हा विभाग एका अंशकालिन अधिव्यवसायोपचार व अंशकालिन भौतिकोपचारक यांच्या ताब्यात होता.

मानद सहाय्यक स्त्री रोग तज्ञ व मानद सहाय्यक शल्यक्रियातज्ञ यांच्या नियुक्त्यांमुळे विभाग, औषधे, शल्यक्रिया व स्त्री रोग यासाठी स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग चालू करणे शक्य झाले. तसेच मोठ्या शस्त्रक्रिया होऊ लागल्या. त्यासाठी शस्त्रक्रियागृहे सर्व साधनांनी सुसज्ज करण्यात आली. मानद भूलतज्ञांची सेवा उपलब्ध करण्यात आली. वेगवेगळ्या वैद्यकिय सुविधांत वाढ झाल्यामुळे 78 खाटा सामावण्याची रुग्णालयाची क्षमता लोकांच्या वाढत्या गरजेच्या पमाणात फारच अपुरी पडू लागली. त्यामुळे 52 खाटांच्या क्षमतेचे दोन विभाग बांधण्यात येऊन मार्च 1975 मध्ये चालू करण्यात आले, त्यानुसार आवश्यक कर्मचारी वर्गातही वाढ करण्यात आली.

1978 मध्ये नेत्ररोग रुग्णांसाठी एक व कान, नाक, घसा रुग्णांसाठी एक असे दोन जादा विभाग चालू करण्यात आले. मे 1988 अत्यावश्यक वैद्यकिय सेवा हा विभाग उपलब्ध करण्यात आला ज्यात अस्थिव्यंग, भाजलेले रुग्ण, अतिदक्षता, हृदय अतिदक्षता हे विभाग आहेत. 24 तासासाठी अपघात विभाग आहे. आता ह्या रुग्णालयात पुढील प्रमाणे विभाग आहेत.

| अनुक्रमांक | विभागाचे नाव | खाटांची संख्या |
|---|---|---|
| 1. | वैद्यकिय विभाग | 41 |
| 2. | शल्यक्रिया विभाग | 25 |
| 3. | बालरुग्ण विभाग | 10 |
| 4. | कान, नाक व घसा | 05 |
| 5. | नेत्ररोग विभाग | 05 |
| 6. | अस्थिव्यंग विभाग | 25 |
| 7. | ह्दय अतिदक्षता विभाग | 10 |
| 8. | अतिदक्षता विभाग | 15 |
| 9. | अपघात विभाग | 04 |
| | खाटांची एकूण संख्या | **140** |

ह्या रुग्णालयात वेगवेगळे बाह्यरुग्ण कक्ष आहेत. वेगवेगळ्या बाह्यरुग्ण विभागाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहेत.

| अनु क्र. | विभाग | | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | वैद्यकिय | दररोज सकाळी | 8.00 ते 11.30 व दुपारी 1.00 ते 3.00 |
| 2 | बालरुग्ण | दररोज सकाळी | 8.00 ते 11.30 व दुपारी 1.00 ते 3.00 |
| 3 | शल्यक्रिया | सोम, बुध, शुक्र | सकाळी 8.00 ते 11.30 |
| 4 | कान, नाक व घसा | मंगळ, गुरु, शनि | सकाळी 8.00 ते 11.30 |
| 5 | नेत्ररोग | सोम, बुध, शुक्र | सकाळी 8.00 ते 11.30 |
| 6 | अस्थिव्यंग | मंगळ, गुरु, शनि | सकाळी 8.00 ते 11.30 |
| 7 | कार्डिऑलॉजी | सोम, बुध | सकाळी 8.00 ते 11.30 |
| 8 | त्वचा रोग | शनिवार सोडून दररोज | दुपारी 1.30 ते 3.00 |
| 9 | दंतचिकित्सा | सोम, बुध, शुक्र | सकाळी 8.00 ते 1.00 |
| 10 | क्ष-किरण विभाग | दररोज | सकाळी 8.00 ते रात्रौ 11.00 वाजेपर्यंत |
| 11 | ह्रदय स्पंदन आलेख | दररोज | सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत |
| 12 | अधिव्यवसायोपचार व भौतिकोपचार | दररोज | सकाळी 9.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत |
| 13 | प्रयोगशाळा | दररोज | सकाळी 8.00 ते रात्रौ 9.00 वाजेपर्यंत |
| 14 | व्ही.सी.टी.सी. | दररोज | सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत |

हया रुग्णालयात 5 शस्त्रक्रियागृहे आहेत

| | | |
|---|---|---|
| 1. | शस्त्रक्रिया | मंगळवार, गुरुवार, शनिवार |
| 2. | कान,नाक व घसा | सोमवार, बुधवार, शुक्रवार |
| 3. | अस्थिव्यंग | सोमवार, बुधवार, शुक्रवार |
| 4 | किरकोळ शस्त्रक्रिया | सोमवार, बुधवार, शुक्रवार |
| 5 | छोट्या शस्त्रक्रिया | मंगळवार, गुरुवार, शनिवार |